भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर
ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur
An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२६ –२७: साप्ताहिक विसावा पीक सल्ला
## (कालावधी २२ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर २०२६)

## अ. मृदा आरोग्य, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापनाबाबत सर्वसाधारण सूचना

**कापसाचे अधिक उत्पादन मिळण्यासाठी जमिनीचे संतुलित पोषण, योग्य पाणी व्यवस्थापन तसेच कीड व रोगांचे नियमित निरीक्षण करून एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.** पीक वाढीच्या सर्व टप्प्यांमध्ये एकात्मिक पीक व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास पिकाची वाढ जोमदार होते, उत्पादन खर्चात बचत होते आणि कीड व रोगांमुळे होणारे संभाव्य नुकसान टाळता येते.

### मृदा आरोग्य व अन्नद्रव्य व्यवस्थापन (एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन- INM)

- **प्रमुख अन्नद्रव्यांच (NPK) संतुलित व्यवस्थापन**:
  जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी पीक फेरपालट, सेंद्रिय खतांचा वापर, शेणखत, कंपोस्ट, हिरवळीचे खत वापर ई. तसेच आच्छादन पिकांचा अवलंब करावा. पेरणीपूर्वी मातीची तपासणी करून त्यानुसार रासायनिक खतांचा संतुलित व शिफारशीनुसार वापर करावा.
- **सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करा:** जस्त, बोरॉन, मँगनीज आणि मॅग्नेशियम यांसारख्या दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळल्यास आवश्यकतेनुसार लक्ष्यित पर्णीय फवारणीद्वारे ती दूर करावी.

### रोग व्यवस्थापन (एकात्मिक रोग व्यवस्थापन - आयडीएम)

- **प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब करा**:
  जमिनीद्वारे पसरणारे तसेच पर्णभागावरील रोगकारकांचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करावा. यामध्ये शेताची योग्य स्वच्छता राखणे, तसेच बियाणे व मृदा प्रक्रियेसाठी जैविक कीटकनाशके (बायोपेस्टिसाइड्स) आणि जैवखते (बायोफर्टिलायझर्स) यांचा वापर करावा. यामुळे पिकांची सशक्त वाढ होण्यास मदत होते व रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्यास सहाय्य होते.
- **पांनांवरील रोगांचे नियंत्रण:**
  हवेतील आर्द्रता जास्त असलेल्या कालावधीत शेताची नियमित पाहणी करावी. रोगाच्या जलद वाढीस व प्रसारास अनुकूल हवामान परिस्थिती असल्यासच शिफारशीनुसार बुरशीनाशकांचा विवेकपूर्ण वापर करावा.

### कीड व्यवस्थापन (एकात्मिक कीड व्यवस्थापन - आयपीएम)

- **नियमित शेत पाहणी करा:** फुलकिडे, मावा, तुडतुडे, लाल कोळी यांसारख्या रसशोषक किडी तसेच बोंडअळींच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी दर आठवड्याला शेताची नियमित पाहणी करावी.

- **सापळे व जैविक कीडनाशकांचा वापर करा:** हंगामाच्या सुरुवातीपासूनच प्रौढ पतंगांच्या हालचालींचे निरीक्षण व अंडी घालण्याच्या कालावधीचा अंदाज घेण्यासाठी फेरोमोन सापळे लावावेत. तसेच कीड व्यवस्थापनासाठी प्रथम प्राधान्याने सेंद्रिय, नैसर्गिक किंवा वनस्पतीजन्य कीडनाशकांचा वापर करावा.
- **नैसर्गिक शत्रू कीटकांचे संवर्धन करा:** लेडीबर्ड भुंगेरे, लेसविंग आणि बिग-आयड बग यांसारख्या उपयुक्त मित्रकिडींचे संवर्धन करण्यासाठी व्यापक परिणाम करणाऱ्या कीटकनाशकांऐवजी निवडक कीटकनाशकांची निवड करावी.

- **रासायनिक कीटकनाशकांचा मर्यादित वापर करा:** रासायनिक कीटकनाशकांचा वापर हा शेवटचा पर्याय म्हणूनच करावा किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळी गाठल्यानंतरच लेबलवरील शिफारशीनुसार योग्य रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा..

## कापसाची स्वच्छ वेचणी व साठवणूक

- चांगला बाजारभाव मिळण्यासाठी कापसाची वेचणी योग्य पद्धतीने आणि स्वच्छ करावी.
- कापूस गोळा करण्यासाठी व साठवून ठेवण्यासाठी प्लास्टिकच्या पिशव्या, प्लास्टिकचे कागद किंवा कापसाव्यतिरिक्त इतर साहित्य वापरणे टाळावे.

## ब स्थानविशिष्ट कृषी सल्ला

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | | | | पुढील आठवड्यात अंदाजे पाऊस (मिमी) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ऑक्टोबर | | | | | | | ऑक्टोबर | | | | |
| | | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
|  | धुळे | | | | | | | | 0.1 | 0.1 | 0 | 0.1 | 0 |
| | नंदुरबार | | | | | | | | 0 | 0.1 | 0 | 0 | 0 |
| | जळगाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0.1 | 0.1 | 0.1 | 0 |
| | अहमदनगर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0 | 0.2 | 0.1 | 0.1 |
| | औरंगाबाद | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0.1 | 0.2 | 0.1 | 0 |
| | जालना | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | 0.1 | 0.2 | 0.2 | 0.1 | 0 |
| | बीड | | | | | | | | 0 | 0 | 0.2 | 0 | 0 |
| | नांदेड | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | परभणी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0 | 0 |
| | हिंगोली | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बुलढाणा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.2 | 0.1 | 0.2 | 0.1 | 0 |
| | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.2 | 0.1 | 0 | 0 | 0 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.2 | 0.2 | 0 | 0 | 0 |
| | अमरावती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0.1 | 0 | 0.1 | 0 |
| | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0 | 0 | 0 |
| | वर्धा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0 | 0 | 0 |
| | नागपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | | 0.1 to 2.4 मिमी | | 2.5 to 15.5 मिमी | | 15.6 to 64.4 मिमी | | | 64.5 to 115.5 मिमी | | | 115.6 to 204.4 मिमी | |
| पावसाची श्रेणी | | खूप हलका पाऊस | | तुरळक पाऊस | | मध्यम स्वरूपाचा पाऊस | | | मुसळधार पाऊस | | | अति मुसळधार पाऊस | |

**पीक परिस्थिती:**

अकोला येथे कापूस पीक पेरणीनंतर ११३ ते ११८ दिवसांचे झाले असून सध्या बोंडांची वाढ व बोंडे पक्व होण्याच्या अवस्थेत आहे. पिकावर कीटकनाशकाची फवारणी करण्यात आली आहे. लवकर पेरणी केलेल्या पिकात आणि लवकर तयार होणाऱ्या वाणांमध्ये कापूस वेचणी सुरू झाली आहे. अहवालाच्या आठवड्यात पावसाचा मोठा खंड पडला. गेल्या ७० दिवसांपासून जमिनीत ओलावा कमी असल्यामुळे पिकाची वाढ खुंटलेली दिसून येत आहे. काही शेतांमध्ये पानांवर तपकिरी ठिपके व मायरोथेशियममुळे होणारे पानांवरील ठिपके आढळून आले. तसेच काही शेतांमध्ये पानांवर करड्या बुरशीची (ग्रे मिल्ड्यू) लक्षणेही दिसून आली.

राहुरी येथे पेरणीच्या वेळेनुसार कापूस पीक १०६ ते १४१ दिवसांचे झाले असून सध्या बोंडांची वाढ व बोंडे फुटण्याच्या अवस्थेत आहे. पिकाला पाणी देणे, कोळपणी, खुरपणी, फवारणी व खतांचा वापर ही कामे करण्यात आली आहेत.

शेतामध्ये तणांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. फुलकिड्यांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या खाली आहे; मात्र अनेक शेतांमध्ये तुडतुडे व मावा यांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर गेला आहे. काही शेतांमध्ये मायलोसेरस भुंग्यामुळे ० ते १ टक्के कापूस झाडांचे नुकसान आढळून आले आहे. काही ठिकाणी गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर गेला आहे. अनेक शेतांमध्ये तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) आणि मर रोगासारखी लक्षणे आढळून आले आहेत. काही ठिकाणी कापूस वेचणी सुरू झाली आहे.

नांदेड येथे पेरणीनुसार कापूस पीक १०२ ते १२७ दिवसांचे झाले असून सध्या बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहे. अहवालाच्या कालावधीत आंतरमशागत, खुरपणी, खतांचा वापर आणि कीड नियंत्रणासाठी फवारण्या करण्यात आल्या. शेतामध्ये गवतवर्गीय, रुंद पानांची तणे तसेच लव्हाळा वर्गातील तणांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. तुडतुडे आणि मावा या रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आढळून आला; मात्र तो आर्थिक नुकसान पातळीच्या खाली आहे. काही शेतांमध्ये मूळकूज रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला आहे.

**पीकसल्ला:**

अकोला येथे शेतकऱ्यांनी सिंचनासाठी पाणी मर्यादित उपलब्ध असल्यास कापूस पिकाला एक संरक्षक पाणी द्यावे. पावसाचा दीर्घकाळ खंड पडल्यामुळे पिकाला ओलाव्याचा ताण जाणवत असल्यास १३:००:४५ या विद्राव्य खताची २ किलो प्रति एकर या प्रमाणात १५० ते २०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अशा दोन फवारण्या १० दिवसांच्या अंतराने कराव्यात. पिकात पात्यांची गळ दिसून येत असल्यास पात्या व फुलांची नैसर्गिक गळ कमी करण्यासाठी एनएए ४.५ एसएल या संजीवकाची ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मावा, तुडतुडे व फुलकिडे यांसारख्या रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी तसेच गुलाबी बोंडअळीच्या पतंग मादीला पात्यांवर अंडी घालण्यापासून परावृत्त करण्यासाठी निंबोळी अर्क (NSKE) ५% + कडुनिंब तेल ५ मिली प्रति लिटर पाणी किंवा कडुनिंब तेलावर आधारित ३०० किंवा १५०० पीपीएम तीव्रतेचे उत्पादन ५ मिली प्रति लिटर पाणी आणि १ ग्रॅम कपडे धुण्याचा साबण यांचे द्रावण करून फवारणी करावी. गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी शेतात प्रति एकर २ कामगंध सापळे लावावेत. किडींच्या प्रादुर्भावाची पाहणी करण्यासाठी प्रत्येक एकरातील २० प्रतिनिधिक झाडांचे नियमित निरीक्षण करावे. पिकात पराविल्टची लक्षणे दिसल्यास लक्षणे दिसू लागताच कॉपर ऑक्सिक्लोराइड ५०% डबल्यूपी २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डबल्यूपी १०० ग्रॅम आणि युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या प्रमाणात द्रावण तयार करून झाडांच्या मुळाशी आळवणी करावी. ही आळवणी एक आठवड्याच्या अंतराने २ ते ३ वेळा करावी. फ्युजेरियम मर व मॅक्रोफोमिना मूळकूज रोगाचा प्रादुर्भाव असलेल्या भागात रोगाचा पुढील प्रसार रोखण्यासाठी बाधित झाडांच्या आजूबाजूच्या झाडांच्या मुळाशी कार्बेन्डाझिम ५०% डबल्यूपी १.२ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात द्रावणाची आळवणी करावी. त्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने ट्रायकोडर्मा हार्झियानम किंवा ट्रायकोडर्मा व्हिरिडी ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात दोन वेळा आळवणी करावी. मायरोथेशियम पानांवरील ठिपके रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझिम ५०% डबल्यूपी या बुरशीनाशकाची ०.१% तीव्रतेची फवारणी करावी. पूर्णपणे उमललेली कापसाची बोंडे स्वच्छ व काळजीपूर्वक वेचावीत.

राहुरी येथे शेतकऱ्यांनी हाताने खुरपणी किंवा ट्रॅक्टर अथवा बैलचलित औजारांच्या साहाय्याने आंतरमशागत करून कापूस पीक तणमुक्त ठेवावे. तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) रोगाचा आणि फुलकिड्यांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी शेतातील तसेच बांधावरील पार्थेनियम (गाजर गवत) काढून नष्ट करावे. पावसाचा दीर्घकाळ खंड पडल्यामुळे पिकाला ओलाव्याचा ताण जाणवत असल्यास १३:००:४५ या विद्राव्य खताची २ किलो प्रति एकर या प्रमाणात १५० ते २०० लिटर पाण्यात मिसळून दोन फवारण्या १० दिवसांच्या अंतराने कराव्यात. रसशोषक किडींच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी शेताचे नियमित निरीक्षण करावे. त्यासाठी पिवळे चिकट सापळे लावावेत आणि

निंबोळी अर्क (NSKE) ५% किंवा अझाडिरॅक्टिन १०,००० पीपीएम १० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. पेरणीनंतर ६० दिवसांपेक्षा जास्त वयाच्या कापूस पिकात रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या (ETL) वर गेल्यास फ्लोनिकॅमिड ५० डबल्यूजी २ ग्रॅम किंवा बुप्रोफेझिन २५ एससी २० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी प्रति हेक्टर ५ कामगंध सापळे लावावेत. गुलाबी बोंडअळीचा पुढील प्रादुर्भाव टाळण्यासाठी अळीग्रस्त गुलाबासारखी फुले (रोझेट फुले) नियमितपणे गोळा करून त्यातील अळ्यांसह नष्ट करावीत. पिकात पात्यांची गळ दिसून आल्यास पात्या व फुलांची नैसर्गिक गळ कमी करण्यासाठी एनएए ४.५ एसएल या संजीवकाची ४ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) रोगाचा प्रसार टाळण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण करावे. फुलकिड्यांच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी प्रति हेक्टर २० निळे चिकट सापळे लावावेत, तर त्यांच्या नियंत्रणासाठी प्रति हेक्टर १०० निळे चिकट सापळे लावावेत. पूर्णपणे उमललेली कापसाची बोंडे स्वच्छ व काळजीपूर्वक वेचावीत. गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव नसलेला कापूस आणि प्रादुर्भावग्रस्त कापूस स्वतंत्रपणे वेचून वेगवेगळा साठवावा, जेणेकरून बाजारात चांगला भाव मिळण्यास मदत होईल. वेचणीपूर्वी सरकीतील ओलावा योग्य प्रमाणात कमी होण्यासाठी कापूस चांगला वाळू द्यावा आणि स्वच्छ सूर्यप्रकाश असलेल्या वेळेतच कापसाची वेचणी करावी.

नांदेड येथे शेतकऱ्यांनी तणांच्या नियंत्रणासाठी आंतरमशागत व खुरपणी करावी. जमिनीत ओलावा कमी असल्यास उपलब्ध पाण्यानुसार पिकाला संरक्षक पाणी द्यावे. पावसाचा दीर्घकाळ खंड पडल्यामुळे पिकाला ओलाव्याचा ताण जाणवत असल्यास १३:००:४५ या विद्राव्य खताची २ किलो प्रति एकर या प्रमाणात १५० ते २०० लिटर पाण्यात मिसळून दोन फवारण्या १० दिवसांच्या अंतराने कराव्यात. रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी पेरणीनंतर ३० दिवसांनी निंबोळी अर्क (NSKE) ५% या द्रावणाची फवारणी करावी. पेरणीनंतर ६० दिवसांपेक्षा जास्त वयाच्या कापूस पिकात रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या (ETL) वर गेल्यास बुप्रोफेझिन २० एससी १००० मिली प्रति हेक्टर किंवा डायनोटेफ्युरॅान २० एसजी १५० ग्रॅम प्रति हेक्टर या प्रमाणात फवारणी करावी. फुलकिड्यांची संख्या वाढणे आणि तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी शेत व बांध तणमुक्त ठेवावेत. तसेच शेतात आणि शेताच्या आजूबाजूला असलेले पार्थेनियम (गाजर गवत) काढून नष्ट करावे. पानांवरील ठिपके व बोंड कुज रोगाच्या नियंत्रणासाठी खालीलपैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी: कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डबल्यूपी ३० ग्रॅम किंवा प्रोपिकोनॅझोल २५% ईसी १० मिली किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२% + डिफेनोकोनॅझोल ११.४% एससी १० मिली किंवा फ्लुक्सापायरॉक्सॅड १६७ ग्रॅम/लिटर + पायरॅक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅम/लिटर एससी ६ मिली. पिकात पात्यांची गळ दिसून आल्यास पात्या व फुलांची नैसर्गिक गळ कमी करण्यासाठी एनएए ४.५ एसएल या संजीवकाची ४ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

The detailed information regarding cotton production technology, e.g., selection of soil, varieties, fertilizer application, sowing methods, irrigation systems, management of weeds, insect pests and diseases, etc., can be availed from an Android-based **CICR Cotton App** developed by ICAR-CICR, Nagpur. The app can be downloaded free of cost from Google Play Store. Additionally, the crop growth stage-specific and weather-based weekly advisories are uploaded on the website of ICAR-CICR (https://cicr.org.in/weekly-advisory/) also to be consulted for the benefit of farmers.

**Advisory issued by:**
**Dr. Vijay N. Waghmare**

Director, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur

**Compilation by** Dr. Isabella Agarwal

**Editing Team:**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. G. T. Behere | Dr. A. S. Tayade | Dr. A. H. Prakash | Dr. S.K. Verma |
| Dr. S.K. Sain | Dr. Rishi Kumar | Dr. Babasaheb B. Fand | Dr. Ramkrushna GI |
| Dr. S.P Gawande | Dr. Shivaj Thube | Dr. R.R. Chapke | |

**Regional language translation**:

**Hindi** : Mr Ghanshyam Deogirikar & Mr Ashutosh Mishra
**Punjabi** : Dr Amarpreet Singh
**Tamil** : Dr. A. Manikandan & Dr. M Saravanan
**Telugu** : Dr L. Rajesh Chaudhary
**Marathi** : Dr Vrushali Deshmukh & Mrs Pooja Ghonge
**Gujrati** : Dr H R. Desai & Dr Vivek Shah
**Oriya** : Dr B. S. Nayak
**Kannada** : Dr Neelkanth Hiremani